# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नीत

प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, तोंडगाव संचालित

# मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

## राष्ट्रीय सेवा योजना

**नियमित शिबीर अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्त 'भारतीय संविधान' विषयावरील व्याख्यान व महात्मा जोतीराव फुले जयंती.**

दि: 11/04/2022 स्थळ : मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्त 'भारतीय संविधान' विषयावरील व्याख्यान व महात्मा जोतीराव फुले जयंती.

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळेच त्यांना राज्यघटनेचे शिल्पकार संबोधले जाते. त्यामुळेच बाबासाहेबांच्या जयंतीच्या निमित्ताने या आठवडयामध्ये विविध कार्यक्रम आयोजीत करण्याचे सरकारने सूचित केले आहे. याअनुषंगाने महाविद्यालयात 'भारतीय संविधान' या विषयावर महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून श्री संजय गोटे यांची उपस्थिती होती. तर मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही.बी.चांदजकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बी.आर.तनपुरे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचा घटनाक्रम विशद केला. तसेच त्यांनी राज्यघटनेच्या निर्मितीत बाबासाहेबांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगीतले. श्री संजय गोटे यांनी आपल्या मनोगतात. भारतीय संविधान पूर्ण जगात एकमेवाद्वितिय असल्याचे सांगीतले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनीही आपले विचार व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीय नागरिकाची असल्याचे सांगीतले. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांने संविधानाचा अभ्यास करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली वानखेडे हिने केले. कार्यक्रमाला रासेयो महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. पी.एस. पाथरकर, प्रा. बी.डी. पट्टेबहादूर, डॉ. व्ही.एन.लांडे, डॉ. व्ही. ई. डोणगावकर आदी शिक्षकांसह, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim




दि. ११ एप्रिल २०२२ रोजी 'भारतीय संविधान' विषयावर बोलताना मा. प्राचार्य. डॉ. जी. एल. कुबडे.




'भारतीय संविधान' विषयावर व्याख्यान देताना डॉ. व्ही. बी. चांदनकर.

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI. COLLEGE * WASHIM *

देशोन्नती
माझं शहर
वाशिम, शुक्रवार, दि. २२ एप्रिल २०२२ ४

# मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात कार्यक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वाशिम** ■ मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एस. कुबडे हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास चांदजकर यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य संजय गोटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बी आर तनपुरे यांनी केले. त्यात त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाविषयी मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. चांदजकर यांनी भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ संविधान असून या संविधानाचे माध्यमातूनच भारताने मोठ्या प्रमाणामध्ये प्रगती केली आहे. संविधान हे कोणत्याही लोकशाहीचे रक्षक असते. या बाबी लक्षात घेऊन डॉ. आंबेडकरांनी अतिशय मेहनतीने भारतीयांसाठी एक संविधान निर्माण करून ठेवले आहे. संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य ,मार्गदर्शक तत्वे ,संसदीय शासन पद्धती, निवडणूका इत्यादीचे सविस्तर लिखाण करण्यात आले आहे. येथील नागरिकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी संविधान हा आधारस्तंभ असल्याचे त्यांनी या प्रसंगी सांगितले. संजय गोटे यांनी आपल्या मार्गदर्शनात डॉ. आंबेडकरना सामाजिक व आर्थिक क्षेत्रात सुद्धा लोकशाही अभिप्रेत होती. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्वावर त्यांचा दृढ विश्वास असल्याचे सांगितले. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. जी एस कुबडे यांनी भारतीय संविधानातील आदर्श जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन कु. अंजली वानखेडे हिने केले तर उपस्थितांचे आभार भारती लोखंडे हिने मानले.

याप्रसंगी कु. राधा ठाकरे, रोहिणी इंगोले, प्रतिमा कांबळे, वैभव इंगोले, राजश्री राठोड आदींनी आपली मनोगते व्यक्त केली. सदर कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद सह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. (ता.प्र. )

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI. COLLEGE * WASHIM *

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim